**दिनांक 05.01.2024 रोजी प्राप्त प्रशासकीय विषय**
**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक 144 -** अमरावती स्थित मौजे - नवसारी सर्व्हे क्र. 126/1 मधील 0 हे. 70 आर जागा कृषी वापर क्षेत्रातुन वगळुन रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्रमांक 144 -** अमरावती स्थित मौजे - नवसारी सर्व्हे क्र. 126/1 मधील 0 हे. 70 आर जागा हि खाजगी मालकीची आहे. अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु) नुसार सदर जागा कृषी वापर क्षेत्रात दर्शविलेली आहे. मौजे - नवसारी सर्व्हे क्र. 126/1 मधील 0 हे. 70 आर जागा कृषी वापर क्षेत्रातून वगळुन रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि सदर समिती सद्य:स्थितीत कार्यरत नसल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार प्राधिकरणाचे सर्व अधिकार प्रशासन यांचेकडे असल्याने सदर प्रस्ताव मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदेशीक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 नुसार नागरीकांचे हरकती व सूचना नोंदवुन त्याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन अंतिम ठराव पुन्हा मान्यतेकरीता नियोजन प्राधिकरणाकडे न पाठवता सरळ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचे अधिकारही प्रशासनास देण्यात यावे.सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. 05/01/2024 ला मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय शहर सुधार समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु सद्य:स्थितीत सर्वसाधारण सभा व विषय समित्या अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम.

स्वा-
नगर सचिव,
महानगरपालिका, अमरावती

स्वा-
प्रशासक,
महानगरपालिका, अमरावती

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.